बदलांसाठी केलेल्या वातावरण निर्मितीसाठी किंवा घडवून आणलेला बदल आपल्याला या चळवळींचा व्यापक विचार करण्यास भाग पाडले सोशल मिडीयाच्या व्यासपीठावर जबाबदारीने अशी निर्मिती झाली असल्याचे व्यापक परिणाम दिसू शकतात. एका विशिष्ट स्वरूपाची भावना असलेल्या व्यक्तीच्या गटांना किंवा समूहांना अपेक्षित ध्येयापर्यंतची वाटचाल सुकर करून देण्यामध्ये सोशल मिडीया आता महत्वाचा ठरू लागला आहे. फेसबुक किंवा ट्विटर हे विशिष्ट विषय चर्चेला घेणे तसेच हॅशटॅग सारखी तांत्रिक सूत्रे वापरून अशा विशिष्ट मुद्यांसाठीचा ओढा निर्माण करणे याचा वे शक्य झाल्यास ट्रेंडिंग मुद्यामध्ये स्थान मिळवणे आणि त्यामध्ये सातत्य ठेवत अपेक्षित धोरणापर्यंत पोहोचणे या सर्वसाधारण टप्प्यामध्ये अशा चळवळी पुढे सरकत आहेत.

प्राथमिक टप्प्यावर ईमेल वरून आंदोलन आणि त्यांच्या उद्देशा विषयीच्या माहितीचे प्रसारण सोशल मिडीया वरून आंदोलना च्या समर्थनात निघालेल्या मोर्चाच्या छायाचित्रांचा प्रसार जिटि नेटिझन्सचा या आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी केलेले आवाहन आंदोलनासाठी म्हणून वाहिलेल्या / वापरलेल्या वेबसाईट वा फेसबुक पेजला लाईक करण्याविषयी केलेले आवा हन अशा

टप्प्यांमध्ये या आंदोलनाला मिळणारा प्रतिसाद वाढत राहीला त्यातून तयार झालेला जनमतांचा आवाज वा त्यानंतरच्या काळामध्ये राजकीय परिवर्तनासाठीही उपयुक्त ठरला. या आंदोलनाच्या जोडीनेच वेगवेगळ्या व्यावसायिक सामाजिक विषयांना वापरलेली अनेक व्यासपीठे सोशल मिडीयावर उभी राहिली आहेत. त्यावर व्यापक चर्चा आणि समस्यांवरील उपाय समोर येत आहेत. दिल्लीमधील आरुषी खूनप्रकरणाची सोशल मिडीयाच्या विविध व्यासपीठावरून झालेली चर्चा त्याद्वारे तयार झालेला जनमतांचा आवाज नेटीझन्सच्या/स्थानिकांच्या एकात्मतेचे प्रतिक म्हणून विचारात घेतले. एका विशिष्ट समस्यांच्या विरोधात असलेल्या समाजाची जात, धर्म, प्रदेश, संस्कृतीच्या पलीकडे जाऊन समोर येणारी एकात्मता, प्रतिभा अशा आंदोलनामधून सातत्याने अनुभवायला मिळत आहेत. काहीतरी बदल घडवून आणायच्या अपेक्षेने फेसबुक किंवा ट्विटरचा वापर करण्यामध्ये विविध सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी, समाजकारण, वेळप्रसंगी विरोधाला विरोध करत पुढे येणारे राजकारण तसे आघाडीवर दिसते. फेसबुकच्या व्यासपीठावरून एकाचवेळी अनेक लोक एकत्रितपणे विशिष्ट धोरणांच्या पाठपुराव्यासाठी आग्रहाने राहत असल्याने समस्यांवर वेगवेगळे उपाय चर्चेला घेणे देखील शक्य होत जाते. सोशल मीडियाच्या

व्यासपीठावरून पुढे येणाऱ्या या प्रतिनिधींची दखल मुख्य प्रवाहातील माध्यमांना घ्यावी लागत आहे. ही बाब सोशल मीडियाचे अल्पसंख्यांक प्रतिनिधींसाठीचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली आहे.

★ सामाजिक माध्यमांची पर्यायी ओळख आणि स्वकथन :-

सोशल मीडिया वापरत असताना तुम्ही आम्ही नेमके काय काय करत असतो याचा विचार केला जातो. सोशल मीडिया आणि आपले दैनंदिन व्यवहार हे किती एकरस होऊ लागले आहेत. सोशल मीडियाच्या वेगवेगळ्या व्यासपीठांचा वापर करत असताना आपण किती विशिष्ट बाबी आपल्याला आवडत असल्याविषयीच्या प्रतिक्रिया नोंदवितो काही विशिष्ट बाबींना थेट लिखित प्रतिक्रिया देतो. त्याविषयी आपला अभिप्राय म्हणून छायाचित्राची उपलब्धता करून देणे. काही पोस्टवर उगीचच रेंगाळतो किंवा पुन्हा-पुन्हा तोच आस्वाद घेत असतो. त्यातून आपल्या आवडी-निवडी, आपल्या खरेदी-विक्रीचे तपशील, आपली आवडती ठिकाणे अशा विविध मुद्यांची माहिती आपण स्वतःच संबंधित व्यासपीठावर मांडत असतो. या सर्व माहितीची एकत्रित सांगड घालत तुम्ही-आम्ही नेमके कसे आहोत हे ओळखण्याचे अस्त्र सध्या सोशल मीडिया विश्लेषणाकडे उपलब्ध झालेले आहे.

त्याआधारे विशिष्ट व्यक्तीवर वा गटावर प्रभाव टाकण्यासाठी, त्यांची अभिरुची बदलण्यासाठी, एका वेगळ्या अर्थाने नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न होत आहेत. सोशल मीडियाच्या कोणत्या ना कोणत्या व्यासपीठाचा वापर करणाऱ्या भारतीयांचे सध्याचे दैनंदिन जगणे अशा सर्वच प्रक्रियांचा एक भाग बनले आहे. सोशल मीडियाच्या आधाराने भारतीय लोक अगदी खाजगी पातळीवरील निर्णयासाठीही सोशल मीडिया वरील ओळखी-अनोळखी व्यक्तींची स्वयंघोषित अभ्यासकांची व तज्ज्ञांची माहिती घेत असतो. या अर्थाने सोशल मीडियाच्या संपर्कात असलेला भारतीय समाज वास्तवतातील एका वेगळ्या बंदिस्त जगाकडून एका खुल्या आभासी सामाजिक व्यवस्थेकडे प्रवास करत चालला आहे. सोशल मीडियाच्या आधाराने विकसित होणाऱ्या साधनांचा सामाजिक वापर शक्य होत असतो तसेच समाज मूल्यांच्या आधारावर वैचारिक देवाणघेवाण आणि परस्पर पूरक वर्तनाला चालना देणेही शक्य होते. वैयक्तिक पातळीवरील गरजांकडून एखाद्या विशिष्ट गटाकडे जाणारा प्रवास करत असताना किंवा व्यापक पातळीवर समाजासाठी म्हणून विचार करत असताना सो. मि. (सोशल मीडियाची) वैशिष्ट्ये अधिक उपयुक्त ठरत आहे. सोशल मीडियाची उपलब्धता वेळीच लक्षात घेत औद्योगिक

संस्थांनीही. आपल्या दैनंदिन व्यवहारामध्ये आणि व्यवसाय वृद्धीसाठीच्या विविध उपक्रमांमध्ये सोशल मीडियाशी संबंधित विशिष्ट धोरणे विकसित करणे त्या धोरणांची अंमलबजावणी करणे या दोन्ही बाबींवर भर दिल्याने भारतामध्ये गेल्या काही काळामध्ये त्याचाच परिणाम कि काय तुम्ही-आम्ही वापरत असलेल्या वेगवेगळ्या सोशल मीडिया व्यासपीठावरून आपण वेगवेगळ्या ब्रँडसची माहिती घेतो, जाहीराती पाहतो, आपण शोध घेत असलेली एखादी वस्तू नेमकेपणाने आपल्या नजरेस पडेल अशा पद्धतीने आपल्या सोशल मीडिया वरील प्रोफाईल वरून आपल्या समोर मांडली जाते. त्या आधारे एकाच वेळी व्यवसायवृद्धी / वाढवणे आणि प्रसिद्धी अशा दोन्ही आघाड्यांवर औद्योगिक क्षेत्र पुढे जात आहे. अर्थातच सोशल मीडियाच्या सर्वसामान्य वापरकर्तेच अगदी रोजच्या वापरातून अशा संस्थांसाठी एका वेगवेगळ्या प्रकाराने मदत करत आहेत. या व्यतिरिक्त मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांनी समाज माध्यमांच्या वेगवेगळ्या व्यासपीठांचा आपल्या दैनंदिन व्यवहारात व्यापक उपयोग करून घेण्यास सुरूवात केली आहे. नोकऱ्यांसाठी उमेदवार निवडण्यापूर्वी त्यांचे सोशल मीडिया प्रोफाईल आणि संबंधित उमेदवाराकडे असणारी कौशल्य तपासून पाहत आहेत. सोशल मीडियाच्या मदतीने

आपल्याला ग्राहकापर्यंत पोहोचविण्यासाठी ग्राहकांना विस्तारीत सेवा पुरविण्यासाठी ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्वतंत्रपणे काम केले जाते. वेगवेगळ्या पारंपारीक माध्यमांमध्ये आशयाविषयी सोशल मीडियाच्या व्यासपीठावरून व्यक्त होणाऱ्या नागरीकांच्या संख्येमध्येही अलिकडे मोठी वाढ होऊ लागली आहे. याच बाबीची उपयुक्तता पाहून ट्विटर सारख्या सोशल मीडियाच्या व्यासपीठाने पारंपारीक माध्यम जगाला थेट प्रेक्षकांच्या अपेक्षांशी जोडून दिले आहेत. सोशल मीडिया वापरून आपण पाहत असलेल्या दूरदर्शनवरील मालिका व सोंग्स याविषयी अनेक प्रेक्षक आपली मते थेट व्यक्त करत असतात. तसेच करताना हे प्रेक्षक विशिष्ट हॅशटॅगचा वापर ही करतात. सोशल मीडियाचे असे वापरकर्ते त्या अर्थाने दूरचित्रवाणीच्या पहिल्या स्क्रीनवर पाहिलेल्या गोष्टीविषयी अधिक व्यापक होत गेलेल्या गटामधून किंवा एखाद्या विशिष्ट चौकटीमधील समाजासमोर आपली मते मांडू लागतात. या माध्यमातून ती दूरचित्रवाणी मालिका व संबंधित चॅनेलच्या व्यवस्थापनाच्या व्यासपीठावर जाऊन पोहोचते. या प्रक्रियेसाठी मालिका दूरचित्रवाणीचा पडदा हा पहिली स्क्रीन किंवा व्यासपीठ मानल्यास दुसरी पद्धती (Seconds Screen) ठरते. हा दुसरा पडदा पहिल्या पडद्याविषयी आवड निर्माण

करण्यासाठी (TV) पहिल्या पडद्यावरील चर्चा अधिक व्यापक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरत आहे. 'सत्यमेव जयते' या सारख्या मालिका दूरचित्रवाणी मालिकांना या (Seconds Screen) मोबाईल व सोशल मीडियाचा खूप जास्त उपयोग झाल्याचे भारतामध्ये अनुभवायला मिळाले आहे. ही प्रतिसाद विचारत घेते सत्यमेव जयते च्या ति - माध्यमाने आपल्या मालिकेचा इतरही केवळ ट्विटरवरूनच प्रसारित केला आहे. ट्विटर वापरणाऱ्यांना थेट अमिरखानशी संवाद साधण्याची, प्रश्न विचारण्याची व आपली मते मांडण्याची आणि त्याविषयी प्रत्यक्ष कार्यक्रमामधून अधिक माहिती म्हणून जाणून घेण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सारांश :-

2] प्रकरण 2 रे [आधुनिक सामाजिक माध्यमांचे स्थान व त्यांचा वापर]

आधुनिक सामाजिक माध्यमांनी मानवी जीवनात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत. शिक्षण, संवाद, व्यवसाय, मनोरंजन आणि सामाजिक जनजागृती

या क्षेत्रात त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. सामाजिक माध्यमांचा योग्य आणि विवेकपूर्ण वापर केल्यास व्यक्तीच्या विकासाबरोबरच समाजाच्या प्रगतीलाही मदत होते.

प्रकरण 3 रे सामाजिक परिवर्तनात समाज माध्यमांची भूमिका

१) लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे व त्यांना एकत्र ठेवणे :-

प्रस्तावना :-

सामाजिक माध्यमे म्हणजे फेसबुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम - जी

लोकांना जोडण्याचे काम करतात. आज जग एक छोटे गाव बनले आहे ते यामुळे.

अ) लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे :-

१) आरोग्य विषयक जागरूकता :

कोरोना काळात लस, मास्क, हात धुणे यांची माहिती सरकारने व्हॉट्सॲप / फेसबुकवरूनच दिली. स्वच्छ भारत, हिवताप, डेंग्यू याची माहिती यावरूनच पसरते.

२) सरकारी योजना व शिक्षण विषयक जागरूकता :-

शेतकऱ्यांना पीक विमा, अनुदान, बाजार भाव, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, नोकरीची जाहिरात सर्वात आधी टेलिग्राम आणि व्हॉट्सॲपवर मिळते.

३) सामाजिक अन्यायाविरुद्ध जागरूकता :

एखाद्या ठिकाणी अन्याय झाला तर व्हिडिओ व्हायरल होतो आणि सरकारला कारवाई करावी लागते. उदा. निर्भया आंदोलन, मराठा आरक्षण मोर्चे हे सोशल मीडियामुळेच यशस्वी झाले.

4) पर्यावरण व मतदान जागरूकता :-

'झाडे लावा, पाणी वाचवा', 'प्लॅस्टिक बंदी', 'मतदान करा' अशा मोहिमा फेसबुक, इंस्टाग्रामवर राबवल्या जातात.

5) ग्राहक जागरूकता :-

एखादी कंपनी फसवत असेल तर लोक ट्विटर (X) वर तक्रार करतात आणि कंपनीला उत्तर द्यावेच लागते.

ब) लोकांना एकत्र ठेवणे :-

१) कुटुंबाला एकत्र ठेवणे :-

परदेशात किंवा मुंबई-पुण्यासारख्या शहरात राहणारे लोक रोज व्हिडिओ कॉलद्वारे आपल्या आई-वडिलांशी बोलतात. फॅमिली ग्रुपमुळे सण आणि वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वजण एकमेकांशी जोडलेले राहतात.

२) गावाला / समाजाला एकत्र ठेवणे :-

प्रत्येक गावाचा एक व्हॉट्सॲप (WhatsApp) ग्रुप असतो. लग्न, इतर कार्यक्रम किंवा मृत्यूची बातमी एका मेसेजने सर्वांना कळते.

तसेच रक्ताची (Blood) गरज भासल्यास एका मेसेजवर १०० लोक मदतीसाठी जमा होतात.

३) संकटात एकत्र येणे :-

पूर, दुष्काळ किंवा कोरोना महामारीच्या काळात मदतीसाठी सोशल मीडियावर आवाहन केले जाते आणि लाखो रुपयांची मदत काही तासांत जमा होते. केरळ पूर आणि कोल्हापूर पूर ही याची उत्तम उदाहरणे आहेत.

४) शिक्षण व नोकरीसाठी एकत्र येणे :-

टेलिग्रामवर MPSC चे लाखो विद्यार्थी एकत्र अभ्यास करतात, नोट्स शेअर करतात. फेसबुकवर रोजगाराचे ग्रुप आहेत.

५) सण आणि संस्कृती जपणे :-

गणपती, नवरात्री, दिवाळीचे फोटो, व्हिडिओ शेअर करून दूर असलेले लोकही सणात सहभागी होतात.

तोटे :-

- कधी कधी अफवा पसरवून दोन समाजात भांडण लावले जाते.
- खोटी माहिती पसरवून लोकांची दिशाभूल केली जाते.

सारांश :-

सामाजिक माध्यमे ही दुधारी तलवार आहे. चांगला वापर केला तर ती लोकांमध्ये जागरूकता निर्माण करून त्यांना एकत्र ठेवते आणि समाजाला प्रगतीकडे नेते.

अ) आधुनिकीकरण व सांस्कृतिक देवाण-घेवाण :-

प्रस्तावना :-

आधुनिकीकरण म्हणजे जुन्या रुढी परंपरा सोडून नवीन विज्ञान, तंत्रज्ञान आणि विचार स्विकारणे आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण म्हणजे एका संस्कृतीने दुसऱ्या संस्कृतीचे चांगले गुण घेणे. हे दोन्ही आज सामाजिक माध्यमांमुळे शक्य झाले आहे.

आ) आधुनिकीकरण घडवून आणण्यात माध्यमांची भूमिका

१) विचारात आधुनिकता :-

पूर्वी बालविवाह, हुंडा, जातीभेद योग्य मानले जायचे. पण फेसबुक, युट्युब वर मोठ्या लोकांचे विचार पाहून आज तरुणांचे विचार बदलले आहेत. मुलगी शिकली पाहिजे हा विचार सोशल मीडियानेच रुजवला.

२) राहणीमानात आधुनिकता :-

शहरातील लोक कसे राहतात, कसे कपडे घालतात, घर कसे सजवतात हे इंस्टाग्राम / युट्युब वर पाहून गावातील लोकही तसे राहण्याचा प्रयत्न करतात.

३) शेतीत आधुनिकीकरण :-

पूर्वी शेतकरी जुन्या पद्धतीने शेती करायचा. आज युट्युबवर आधुनिक ड्रोनने फवारणी, सेंद्रिय शेतीचे व्हिडिओ पाहून शेतकरी आधुनिक झाला आहे. पालघरच्या शेतकऱ्याने इजरायलची शेती पद्धत युट्युबवरूनच शिकली.

४) शिक्षणात आधुनिकीकरण:

पूर्वी फक्त पुस्तकातून शिक्षण होते. आज ऑनलाईन क्लास, गुगल मीट, टेलिग्राम नोट्स, AI चा वापर - हे सर्व आधुनिकीकरण सोशल मीडियामुळे आले आहे.

५) व्यवसायात आधुनिकीकरण:

पूर्वी दुकानातच माल विकावा लागायचा. आज इंस्टाग्राम पेज, व्हॉट्सॲप बिझनेस, ऑनलाईन पेमेंट - यामुळे छोटा व्यापारी देखील आधुनिक झाला आहे.

६) सांस्कृतिक देवाण-घेवाण:

१) खाद्यसंस्कृतीची देवाण-घेवाण :

पूर्वी आपल्याला फक्त वरण-भात माहित होता. आज इंस्टाग्राम रील्समुळे आपण पंजाबी छोले-भटूरे, चायनीज, इटालियन पिझ्झा घरी बनवतो. तसेच आपली पुरणपोळी, वडापाव आता अमेरिकेपर्यंत पोहोचला आहे.

२) भाषा आणि पेहरावाची देवाण-घेवाण :

आज मराठी मुले कोरियन भाषा शिकत आहेत. BTS ऐकत आहेत. हे युट्युब / इंस्टाग्राममुळेच तसेच आपले धोतर-कुर्ता, साडी हे परदेशी लोकांना आवडू लागले आहे.

३) सण आणि उत्सवाची देवाण-घेवाण :

आपण आता फ्रेंडशिप डे, मदर्स डे, व्हॅलेंटाईन डे साजरा करतो जे पाश्चात्य संस्कृतीतून आले आहे. तसेच आपला गणपती उत्सव, दिवाळी आता अमेरिका, लंडनमध्ये मोठ्या प्रमाणात साजरी होते. ते फेसबुक लाईव्हमुळे जगाला कळते.

४) कला आणि संगीताची देवाण-घेवाण :

आपले लावणी, कोळी गीत युट्युब मुळे जगभरात पोहोचले तसेच आपण इंग्रजी गाणी, भांगडा, गरबा शिकतो. एका संस्कृतीचे संगीत दुसऱ्या संस्कृतीत मिसळून नवीन संगीत तयार होत आहे.

५) विचार आणि मूल्यांची देवाण-घेवाण :

जगभरातील चांगले विचार उदा. वेळ पाळणे, स्वच्छता, प्रामाणिकपणा हे आपण परदेशी संस्कृतीतून घेतो आणि आपले पाहुण्यांचा आदर करणे, वडिलांचा मान ठेवणे हे संस्कार जगाला देतो.

तोटे / आव्हाने :-

"पाश्चात्य संस्कृतीचे अनुक्रमण"आधुनिकतेच्या नावाखाली आपण आपली मराठी संस्कृती, भाषा विसरून चाललो आहोत.

२) अपसंस्कृती पसरणे :-

अश्लील रील्स, चुकीचे फॅशन ट्रेंड तरुणांमध्ये पसरत आहेत.

सारांश :-

आधुनिकीकरण आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण ही काळाची गरज आहे. सामाजिक माध्यमांमुळे आज जगातील कोणतीही संस्कृती ही बंदिस्त राहिलेली नाही.

सामाजिक माध्यमे आणि समाज यांचा संबंध :-

- **संवादाचा संबंध:** पूर्वी लोक पत्राने बोलवायचे, आज सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत माणूस व्हॉट्सॲप, इंस्टाग्रामवरच असतो. कुटुंब, मित्र, नातेवाईक यांच्याशी संबंध टिकवून ठेवण्याचे सर्वात मोठे साधन म्हणजे सामाजिक माध्यमे.
- **नातेसंबंधावर परिणाम :-**
    - **चांगला परिणाम:** परदेशात असलेल्या मुलाशी रोज व्हिडिओ कॉलवर बोलतो, नाते घट्ट राहते.

सारांश :-

3] प्रकरण 3 रे सामाजिक परिवर्तनात समाज माध्यमांची भूमिका :-

समाजमाध्यमे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्वाची भूमिका बजावतात. ती सामाजिक जनजागृती, समानता, शिक्षण आणि लोकसहभाग वाढविण्यास मदत करतात. समाजमाध्यमांचा योग्य व जबाबदार वापर केल्यास समाजाच्या प्रगतीला चालना मिळू शकते."

प्रकरण 4 थे सामाजिक माध्यमांसंबंधी कायदे, नियम व अधिनियम

- **कलम ५०० मानहानी :-**

कलम ५०० हे मानहानीच्या गुन्ह्यासाठी दिल्या जाणाऱ्या शिक्षेशी संबंधित आहे.

जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची समाजात असणारी प्रतिष्ठा, मान आणि आदर खराब करण्याच्या किंवा कमी करण्याच्या उद्देशाने खोटे आरोप करते, अपमानकारक शब्द बोलते किंवा लिहिते किंवा छापील,डिजिटल स्वरूपात अफवा किंवा बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करते तेव्हा ती व्यक्ती मानहानीचा गुन्हा करते. (मानहानीची व्याख्या IPC कलम ४९९ मध्ये दिली आहे).

- **शिक्षेची तरतूद :-**

दोषसिद्धी झाल्यास आरोपीला २ वर्षांपर्यंतचा साधा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही एकाच वेळी होऊ शकतात.

- **नवीन कायदा :**

१ जुलै २०२४ पासून भारतात नवीन फौजदारी कायदा लागू झाला आहे. जुन्या IPC कलम ५०० ऐवजी आता भारतीय न्याय संहिता (BNS) चे कलम ३५६ (Section 356 of BNS) लागू होते. कलम १५३ हे समाजात बेकायदेशीर कृत्य करून किंवा वादग्रस्त विधाने करून दंगल घडवण्याच्या हेतूने लोकांना चेतावणी देणे या गुन्ह्याशी संबंधित आहे. जेव्हा एखादी व्यक्ती जाणीवपूर्वक किंवा बेजबाबदारपणे बेकायदेशीर कृत्य करते आणि तिला पूर्ण कल्पना असते की या कृत्यामुळे समाजात दंगल किंवा हिंसाचार उसळू शकतो, तेव्हा त्या व्यक्तीवर कलम १५३ अंतर्गत गुन्हा नोंदवला जातो.

- **शिक्षेची तरतूद :-**

या कलमांतर्गत मिळणारी शिक्षा ही चेतावणी दिल्यानंतर प्रत्यक्ष दंगल घडली की नाही यावर ठरते.

जर चिथावणीमुळे दंगल घडली तर १ वर्षांपर्यंतचा कारावास, किंवा दंड, किंवा दोन्ही.

जर दंगल घडली नाही ६ महिन्यांपर्यंतचा कारावास, किंवा दंड, किंवा दोन्ही

गुन्ह्याचे स्वरूप

जामीन : जामीनपात्र या प्रकरणात आरोपीला जामीन मिळणे हा त्याचा कायदेशीर अधिकार आहे.

दखलपात्रता : दखलपात्र पोलीस वॉरंटशिवाय गुन्हा नोंदवून तपास करू शकतात.

न्यायालय : कोणत्याही दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी चालते.

संबंधित कलम : १५३-अ मधील फरक

कलम १५३: सामान्य दंगल घडवण्याच्या हेतूने दिलेल्या चेतावणी साठी लागू होते.

कलम १५३-अ : धर्म, जात, भाषा, जन्मस्थान किंवा रंगावरून दोन वेगवेगळ्या समुदायांमध्ये शत्रुत्व किंवा द्वेष पसरवणे यासाठी लागू होते.

(नवीन कायदा) : १ जुलै २०२४ पासून भारतात नवीन फौजदारी कायदा लागू झाला आहे. जुन्या IPC कलम १५३ ऐवजी आता भारतीय न्याय संहिता (BNS) चे कलम १९२ (Section 192) लागू होते.

कलम ५०९ हे कोणत्याही स्त्रीच्या सन्मानाला, प्रतिमेला किंवा लज्जेला धक्का पोहोचवणाऱ्या कृत्यांविरुद्ध महिलांना संरक्षण देते.

जेव्हा एखादी व्यक्ती स्त्रीच्या लज्जेचा अनादर करण्याच्या उद्देशाने: घाण किंवा अश्लील शब्द बोलते, अश्लील आवाज काढते (उदा. शिट्टी वाजवणे किंवा अश्लील शब्दोच्चार करणे), अश्लील हावभाव किंवा इशारे करते किंवा स्त्रीच्या खाजगी आयुष्यात बाधा आणण्यासाठी कोणत्याही वस्तूचे प्रदर्शन करते, तेव्हा ती व्यक्ती या कलमांतर्गत दोषी ठरते.

शिक्षेची तरतूद :

शिक्षा : दोषसिद्धी झाल्यास आरोपीला ३ वर्षांपर्यंतचा साधा कारावास आणि दंड अशी शिक्षा दिली जाते.

(नवीन कायदा) : १ जुलै २०२४ पासून भारतात नवीन फौजदारी कायदा लागू झाला आहे. जुन्या IPC कलम ५०९ ऐवजी आता भारतीय न्याय संहिता (BNS) चे कलम ७९ लागू होते.

माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० हा भारतातील सायबर गुन्हे आणि इलेक्ट्रॉनिक व्यवहारांशी संबंधित मुख्य कायदा आहे.

हा कायदा १७ ऑक्टोबर २००० रोजी लागू करण्यात आला.

प्रमुख उद्दिष्टे :-

ई-कॉमर्सला मान्यता: ऑनलाईन व्यवहार, डिजिटल स्वाक्षरी आणि इलेक्ट्रॉनिक दस्तऐवजांना कायदेशीर मान्यता देणे.

सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण: हॅकिंग, डेटा चोरी, आणि ऑनलाईन फसवणूक यांसारख्या गुन्ह्यांना प्रतिबंध करणे आणि दंडाची तरतूद करणे.

ई-गव्हर्नन्सला प्रोत्साहन: शासकीय कामे कागदपत्रांऐवजी डिजिटल स्वरूपात हाताळण्यास कायदेशीर आधार देणे.

माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम, २०२१ (IT Rules 2021) हा डिजिटल क्षेत्राचे नियमन करण्यासाठी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने २५ फेब्रुवारी २०२१ रोजी लागू केलेला एक अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे.

हा नियम सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स (WhatsApp, Facebook, Instagram), ओटीटी प्लॅटफॉर्म्स (Netflix, Amazon Prime) आणि ऑनलाईन डिजिटल न्यूज पोर्टल्स यांना लागू होतो.

आयटी नियम २०२१ मधील मुख्य तरतुदी :-

१. सोशल मीडिया कंपन्यांसाठी कडक नियम :

तक्रार निवारण यंत्रणा : कंपन्यांना भारतात एका 'तक्रार निवारण अधिकाऱ्याची' नियुक्ती करणे बंधनकारक आहे. युजर्सच्या तक्रारीचे २४ तासांत उत्तर देऊन १५ दिवसांत तिचे निवारण करावे लागते.

महत्त्वाचे अधिकारी (SSMI Rules): ५० लाखांहून अधिक युजर्स असलेल्या मोठ्या सोशल मीडिया कंपन्यांना भारतात तीन मुख्य अधिकारी नेमणे अनिवार्य आहे:

- मुख्य अनुपालन अधिकारी
- नोडल संपर्क व्यक्ती
- निवासी तक्रार निवारण अधिकारी

पहिल्या संदेशकर्त्याची ओळख : व्हॉट्सअप सारख्या मेसेजिंग ॲप्सवर कोणताही बेकायदेशीर/आक्षेपार्ह मेसेज सर्वात आधी कोणी तयार केला , याची माहिती न्यायालयाच्या किंवा सरकारच्या आदेशानुसार द्यावी लागते.

आक्षेपार्ह कंटेंट हटवणे: महिलांच्या प्रायव्हसीचा भंग करणारे, बनावट किंवा नग्न फोटो तक्रार आल्यावर २४ तासांच्या आत हटवणे बंधनकारक आहे.

२. ओटीटी प्लॅटफॉर्म्ससाठी नियम :

नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राईम आणि हॉटस्टारसारख्या ओटीटी प्लॅटफॉर्म्ससाठी आचारसंहिता लागू केली आहे.

कलम ७९ अंतर्गत सुरक्षिततेची अट :

IT कायद्याच्या कलम ७९ अंतर्गत सोशल मीडिया कंपन्यांना वापरकर्त्यांनी पोस्ट केलेल्या बेकायदेशीर सामग्रीपासून संरक्षण मिळते परंतु, २०२१ च्या नियमांचे पालन न केल्यास कंपन्यांचे हे संरक्षण निघून जाते आणि वापरकर्त्यांच्या बेकायदेशीर पोस्टसाठी प्लॅटफॉर्मवरही थेट कायदेशीर कारवाई (उदा. भारतीय न्याय संहिता/IPC अंतर्गत) केली जाऊ शकते.

प्रश्न : सोशल मीडियाचा अर्थ, स्वरूप, प्रकार आणि आधुनिक समाजातील महत्त्व स्पष्ट करून सामाजिक परिवर्तनातील सोशल मीडियाची भूमिका सविस्तर विशद करा.

उत्तर :

१. प्रस्तावना

आजच्या आधुनिक युगात सोशल मीडिया हा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे जगातील लोक एकमेकांशी सहजपणे संपर्क साधू शकतात. माहितीची देवाणघेवाण करणे, विचार व्यक्त करणे, बातम्या मिळवणे आणि सामाजिक प्रश्नांवर चर्चा करणे यांसाठी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. सोशल मीडियामुळे जग जवळ आले असून सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत.

२. सोशल मीडियाचा अर्थ

सोशल मीडिया म्हणजे अशी इंटरनेट आधारित डिजिटल माध्यमे, ज्यांच्या साहाय्याने व्यक्ती एकमेकांशी संवाद साधतात, माहितीची देवाणघेवाण करतात, छायाचित्रे, व्हिडिओ आणि लेख प्रकाशित करतात तसेच विविध सामाजिक विषयांवर आपले मत व्यक्त करतात.

उदाहरणार्थ, फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, यूट्यूब आणि एक्स यांसारख्या माध्यमांचा सोशल मीडियामध्ये समावेश होतो.

३. सोशल मीडियाचे स्वरूप

सोशल मीडियाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

१. डिजिटल स्वरूप : सोशल मीडियाचा वापर इंटरनेट आणि डिजिटल उपकरणांच्या साहाय्याने केला जातो.

२. परस्परसंवादी स्वरूप : वापरकर्ते एकमेकांशी संवाद साधू शकतात आणि प्रतिक्रिया देऊ शकतात.

३. जलद माहिती प्रसारण : माहिती, बातम्या आणि संदेश कमी वेळात अनेक लोकांपर्यंत पोहोचतात.

४. जागतिक स्वरूप : जगातील विविध देशांतील व्यक्तींशी संपर्क साधता येतो.

५. सहभागात्मक स्वरूप : सामान्य व्यक्तींनाही स्वतःचे विचार, अनुभव आणि माहिती प्रकाशित करता येते.

६. सतत उपलब्धता : इंटरनेटच्या उपलब्धतेनुसार सोशल मीडियाचा वापर कोणत्याही वेळी करता येतो.

४. सोशल मीडियाचे प्रकार

सोशल मीडियाचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१. सामाजिक संपर्काची माध्यमे : फेसबुकसारख्या माध्यमांतून मित्र, नातेवाईक आणि इतर व्यक्तींशी संपर्क साधता येतो.

२. संदेशवहनाची माध्यमे : व्हॉट्सॲप आणि टेलिग्रामद्वारे संदेश, छायाचित्रे, व्हिडिओ आणि कागदपत्रे पाठवता येतात.

३. व्हिडिओ प्रसारणाची माध्यमे : यूट्यूबद्वारे शैक्षणिक, मनोरंजनात्मक आणि माहितीपर व्हिडिओ पाहता येतात.

४. छायाचित्रे आणि लघुचित्रफितींची माध्यमे : इन्स्टाग्रामसारख्या माध्यमांतून छायाचित्रे, रील्स आणि व्हिडिओ शेअर करता येतात.

५. मायक्रोब्लॉगिंग माध्यमे : एक्ससारख्या माध्यमांद्वारे लहान संदेश, मते आणि ताज्या घडामोडी प्रसारित करता येतात.

६. व्यावसायिक संपर्काची माध्यमे : लिंक्डइनसारख्या माध्यमांतून नोकरी, व्यवसाय आणि व्यावसायिक कौशल्यांशी संबंधित माहिती मिळवता येते.

५. आधुनिक समाजातील सोशल मीडियाचे महत्त्व

आधुनिक समाजात सोशल मीडियाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

१. संवादाचे प्रभावी माध्यम : सोशल मीडियामुळे दूरवर राहणाऱ्या व्यक्तींशी सहज संपर्क साधता येतो.

२. माहितीचे प्रसारण : देश-विदेशातील बातम्या, घडामोडी आणि महत्त्वपूर्ण माहिती लोकांपर्यंत पोहोचते.

३. शैक्षणिक महत्त्व : विद्यार्थ्यांना ऑनलाइन व्याख्याने, शैक्षणिक व्हिडिओ आणि अभ्याससाहित्य उपलब्ध होते.

४. आर्थिक महत्त्व : व्यापारी आणि उद्योजकांना त्यांच्या वस्तू व सेवांची जाहिरात करता येते.

५. राजकीय महत्त्व : राजकीय पक्ष, नेते आणि नागरिक विविध सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करू शकतात.

६. मनोरंजनाचे साधन : संगीत, चित्रपट, विनोदी व्हिडिओ आणि विविध कार्यक्रमांचा आनंद घेता येतो.

७. सामाजिक जनजागृती : आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, महिला सुरक्षा आणि सामाजिक समानता यांसारख्या विषयांवर जागृती निर्माण करता येते.

६. सामाजिक परिवर्तनातील सोशल मीडियाची भूमिका

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या रचना, मूल्ये, विचार, परंपरा, संस्था आणि जीवनपद्धती यांमध्ये कालांतराने होणारे बदल होय. सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका बजावतो.

१. सामाजिक जनजागृती निर्माण करणे :

सोशल मीडियाद्वारे बालविवाह, हुंडापद्धती, जातिभेद, स्त्री-पुरुष असमानता आणि अंधश्रद्धा यांसारख्या सामाजिक समस्यांविषयी जनजागृती करता येते. त्यामुळे लोकांच्या विचारांमध्ये बदल घडण्यास मदत होते.

२. महिलांच्या सक्षमीकरणाला प्रोत्साहन :

महिलांना त्यांच्या समस्या, अनुभव आणि विचार मांडण्यासाठी सोशल मीडिया व्यासपीठ उपलब्ध करून देतो. महिला हक्क, शिक्षण, समान संधी आणि सुरक्षितता यांसंबंधी माहितीचा प्रसार करता येतो.

३. शिक्षणाचा प्रसार :

सोशल मीडियामुळे शैक्षणिक माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते. ग्रामीण आणि शहरी भागांतील विद्यार्थी विविध शैक्षणिक साधनांचा वापर करून ज्ञान मिळवू शकतात.

४. सामाजिक चळवळींना चालना :

पर्यावरण संरक्षण, भ्रष्टाचारविरोध, सामाजिक न्याय आणि मानवी हक्क यांसारख्या विषयांवरील मोहिमा सोशल मीडियाच्या मदतीने अधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतात.

५. लोकशाही मूल्यांचा विकास :

नागरिकांना सार्वजनिक प्रश्नांवर आपली मते मांडता येतात. शासनाच्या योजना, धोरणे आणि निर्णयांविषयी चर्चा करता येते. त्यामुळे नागरिकांच्या सहभागाला प्रोत्साहन मिळते.

६. सांस्कृतिक देवाणघेवाण :

सोशल मीडियामुळे विविध भाषा, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांची माहिती मिळते. त्यामुळे परस्पर समज आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढण्यास मदत होते.

७. ग्रामीण विकासाला मदत :

शेतकरी, ग्रामीण उद्योजक आणि स्वयंसेवी संस्था सोशल मीडियाच्या माध्यमातून शेतीविषयक माहिती, शासकीय योजनांची माहिती आणि बाजारपेठेशी संबंधित माहिती मिळवू शकतात.

८. आपत्ती व्यवस्थापन :

पूर, भूकंप आणि इतर नैसर्गिक आपत्तींच्या काळात मदतकार्याची माहिती, सुरक्षिततेविषयी सूचना आणि आवश्यक संपर्क तपशील प्रसारित करण्यासाठी सोशल मीडियाचा उपयोग होतो. मात्र, अशा वेळी माहितीची सत्यता तपासणे आवश्यक असते.

७. सोशल मीडियाचे दुष्परिणाम

सोशल मीडियाचे अनेक फायदे असले तरी त्याचे काही दुष्परिणामही आहेत.

१. खोटी माहिती आणि अफवा वेगाने पसरू शकतात.

२. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे वेळेचा अपव्यय होऊ शकतो.

३. सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक आणि गोपनीयतेचा भंग होण्याचा धोका असतो.

४. सोशल मीडियावरील चुकीच्या माहितीमुळे सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतो.

५. ऑनलाइन छळ आणि अपमानास्पद टिप्पणींमुळे व्यक्तींना त्रास होऊ शकतो.

६. प्रत्यक्ष सामाजिक संवाद आणि कौटुंबिक सहवासासाठी उपलब्ध वेळ कमी होत आहे.

- **परीक्षेत येऊ शकणारे प्रश्न**

१) सोशल मीडिया म्हणजे काय ? त्याचा अर्थ व संकल्पना स्पष्ट करा.

२) सोशल मीडियाची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) सोशल मीडियाचे सामाजिक जीवनातील महत्त्व स्पष्ट करा.

४) सोशल मीडियाचे प्रकार कोणते आहेत ? उदाहरणांसह स्पष्ट करा.

५) सोशल मीडियाचे फायदे व तोटे स्पष्ट करा.

६) सोशल मीडियाचा तरुण पिढीवर होणारा परिणाम स्पष्ट करा.

७) सोशल मीडियाचा शिक्षण क्षेत्रातील उपयोग स्पष्ट करा.

८) सोशल मीडियाचा शिक्षण क्षेत्रातील उपयोग स्पष्ट करा.

९) सोशल मीडियामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या स्पष्ट करा.

१०) सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करण्यासाठी कोणती काळजी घ्य

ते स्पष्ट करा.